तरुण भारत

# सदाफुली

https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com

बुधवार, २३ एप्रिल २०२५

आतील पानावर

पान २ – माझे वडील त्यांना हवं तसे जीवन जगले
पान ३ – रोहित शेट्टीच्या 'ॲक्शनियर'मध्ये जॉन अब्राहम
पान ४ – स्पिरिटसाठी प्रभासचा खास अवतार
पान ५ – अमृता सुभाषचा 'जारण'मध्ये हटके लूक !
पान ६ –अल्फात आलिया, शर्वरीचा ॲक्शन अवतार!



# संजूबाबा पहिल्यांदाच हॉरर कॉमेडीपटात

नुकताच द भूतनी या हॉरर कॅामेडी चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. हा चित्रपट हॅारर कॅामेडी या जॅानरमध्ये आहे. स्त्री या चित्रपटाने हॅार्रर कॅामेडी हा जॅानर आणला असल्याचे सांगितले. त्यानंतर अनेक हॅारर कॅामेडी जॅानरमधील चित्रपट येत गेले. या चित्रपटात अभिनेता संजय दत्त याच्या भूमिकेविषयी चर्चा होत आहे.

संजय दत्त प्रथमच एका हॅारर कॅामेडी चित्रपटात काम करत आहे. यामुळे चाहते त्याचा या चित्रपटातील भूमिका पाहण्यासाठी अत्यंत उत्सुक झाले आहेत. स्त्री या चित्रपटाने हॅारर कॅामेडी हा जॅानर आणला. यानंतर स्त्री २, मुंजा या चित्रपटांनी प्रेक्षकांना खळखळून हसायला भाग पाडले. हे सर्वच चित्रपट प्रेक्षकांना प्रचंड आवडले. परिणामी बॅाक्स ऑफिसवर तगडी कमाई करण्यात या चित्रपटांना यश आले. द भूतनी चित्रपटाचा ट्रेलर पाहताना भीतीपेक्षा हसायला जास्त येते. ट्रेलरमधील हलक्या फुलक्या विनोदामुळे हसू येते. या चित्रपटातील संजय दत्तचा अनोखा अंदाज दाखविण्यात आला आहे. याशिवाय मौनी रॅाय, पलक तिवारी यांच्या देखील या चित्रपटात प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटातील ट्रेलरमध्ये मौनी रॅाय एका चेटकीनीच्या भूमिकेत दिसते. तिचा हा लूक पाहून भीती वाटण्याऐवजी हसू अधिक येते. या चित्रपटात संजय दत्त एका आधुनिक तांत्रिकाच्या भूमिकेत दिसत आहे. तो प्रगत तंत्रज्ञानाच्या मदतीने भूताशी लढताना दिसतो, पलक तिवारी ही देखील चेटकीणच्या भूमिकेत असल्याने खरी चेटकीण कोण आहे, याचे गूढ निर्माण होते. यामुळे द भूतनी चित्रपटाविषयी उत्सुकता निर्माण झाली असून येत्या १८ एप्रिल २०२५ रोजी हा चित्रपट थिएटर्समध्ये रिलीज झाला आहे.






## 'करण अर्जुन' चित्रपटाचा सीक्वल येणार?

अभिनेता शाहरुख खान आणि सलमान खान यांचा 'करण अर्जुन' हा चित्रपट बॉलीवूडमधील सुपरहिट चित्रपटांच्या यादीत गणला जातो. ९० च्या दशकात या चित्रपटाने अक्षरशः चाहत्यांना वेड लावले होते. यात या दोन्ही अभिनेत्यांनी साकारलेल्या सख्ख्या भावांच्या भूमिकेला प्रचंड प्रेम मिळाले. यानंतर आता 'करण अर्जुन'चा सीक्वल येणार असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. परंतु यात सलमान-शाहरुखची जोडी दिसणार नाही. एका मुलाखती दरम्यान दिग्दर्शक राकेश रोशन यांनी याबाबत खुलासा केला आहे. 'करण-अर्जुन २२ मध्ये मला रणबीर कपूर आणि हृतिकला पहायला आवडेल. कारण शाहरुख-सलमाननंतर जर कोणी या दोन्ही भूमिका साकारू शकत असेल, तर ते हेच दोघे आहेत,' असे राकेश रोशन म्हणाले. यानंतर राकेश रोशन यांना तुम्ही 'करण-अर्जुन २' बनवाल का? असेही विचारण्यात आले. त्यावर राकेश रोशन म्हणाले की, जर चांगली पटकथा सापडली तर नक्कीच विचार करेल. राकेश रोशन यांनी सिद्धार्थ कन्नन्च्या पॉडकास्टमध्ये हेसांगितले आहे. 'करण अर्जुन' हा चित्रपट राकेश रोशन यांनी दिग्दर्शित केला होता. तर या चित्रपटात हृतिक रोशननं असिस्टंट म्हणून काम केलं होतं. शाहरुख खाननं अर्जुनची भूमिका साकारली होती आणि सलमान खाननं करणची भूमिका साकारली होती. तर काजोल, ममता कुलकर्णी, राखी गुलजार, जॉनी लिव्हर, अमरीश पुरी, रणजीत, अशोक सराफ आणि आशिफ शेख हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकांमध्ये होते. १३ जानेवारी १९९५ रोजी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाला प्रतिसाद मिळाला होता.

## माझे वडील त्यांना हवं तसे जीवन जगले

अभिनेता बॉबी देओल अनेकदा त्याच्या वडिलांबरोबरच्या बॉण्डिंगबद्दल व्यक्त होताना दिसतो. बॉलीवूडमधील दिग्गज अभिनेते धर्मेंद्र त्याचे वडील आहेत. ॲनिमल या चित्रपटातून बॉबी देओलने पुन्हा एकदा स्वत:ला सिद्ध केले. आता नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत त्याने बॉबी देओलने नुकतीच एक मुलाखत दिली. या मुलाखतीत त्याला विचारले की तुमच्या बाप-लेकांमध्ये म्हणजेच धर्मेंद्र, सनी आणि बॉबी देओलमध्ये सर्वांत उत्तम आयुष्य कोणी जगले आहे? यावर उत्तर देताना बॉबी म्हणाला, मला वाटतं की माझे वडील त्यांना हवं तसं आयुष्य जगले. जसे सेलेब्रिटी लोक इतरांना भेटतात, तसे ते इतरांना भेटत नसत. ते त्यांच्या चाहत्यांना भेटताना एक माणूस म्हणून भेटत असत. त्यांनी अनेकांसाठी खूप काही केले आहे. मला वाटतं की, देओल कुटुंबाला आजही लोकांकडून प्रेम मिळतं, त्याचं कारण ते आहेत. सगळं श्रेय त्यांचं आहे. मी अशा लोकांना पाहिलं आहे, जे माझ्या वडिलांना जाणीव करून देत की, ते कोणीतरी स्पेशल आहेत. पण, माझे वडील त्यांना स्वत:बद्दल काय वाटते, या भावनेबरोबर प्रामाणिक राहिले. मी ही गोष्ट माझ्या वडिलांकडून शिकलो आहे. सनी देओल आणि बॉबी देओलला मोठे होताना जे संस्कार मिळाले, त्याबद्दल बोलताना अभिनेता म्हणाला, यामध्ये फक्त माझ्या वडिलांचं योगदान नाही. माझी आई, माझी आजी आणि पत्नी या सर्वांचं माझ्या आयुष्यात योगदान आहे. जशी माझी आई माझ्या वडिलांबरोबर कोणत्याही परिस्थितीत बरोबर राहिली. माझी सर्वांत मोठी शक्ती माझी पत्नी तान्या आहे.

## रणबीर कपूरच्या 'रॉकस्टार'चा सीक्वल येणार?



रणबीर कपूरच्या कारकीर्दीतला मैलाचा दगड ठरलेला सिनेमा म्हणजे 'रॉकस्टार'. रणबीरने 'रॉकस्टार' सिनेमात साकारलेली जॉर्डनची भूमिका अजरामर ठरली. 'रॉकस्टार' सिनेमाची गाणी आणि ए.आर. रहमान यांनी दिलेल्या संगीताची चांगलीच चर्चा झाली. 'कुन फाया कुन', 'नादान परिंदे' ही 'रॉकस्टार'मधील गाणी आज अनेकांच्या प्लेलिस्टमध्ये असतील. अशातच 'रॉकस्टार'चा सीक्वल येणार अशी चर्चा सुरु झाली आहे. याविषयी 'रॉकस्टार'चे दिग्दर्शक इम्तियाज अलींनी खुलासा केलाय. काय म्हणाले बघा? 'रॉकस्टार'चे दिग्दर्शक इम्तियाज अलींनी कोमल नहाटा यांच्या पॉडकास्टला दिलेल्या मुलाखतीत 'रॉकस्टार'च्या सीक्वलविषयी मौन सोडलं. इम्तियाज म्हणाले की, मी रॉकस्टारचा सीक्वल भविष्यात कधीच बनवणार नाही, असं म्हणणं उचित नाही. एखादी कल्पना डोक्यात आली आणि ती 'रॉकस्टार २'साठी चांगली असेल तर सीक्वल बनवायला काय हरकत आहे. रॉकस्टारच्या सीक्वलसंदर्भात माझ्या डोक्यात एखादी अद्भूत कल्पना आली तर नक्कीच मी सीक्वलचा विचार करेन. २०११ साली 'रॉकस्टार' सिनेमा रिलीज झाला होता. सिनेमात रणबीर कपूरने प्रमुख भूमिका साकारली होती. याशिवाय अभिनेत्री नर्गीस फाखरीने या सिनेमातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं होतं. या दोघांशिवाय सिनेमात पियुष मिश्रा, कुमुद मिश्रा, जयदीप अहलावत या कलाकारांची भूमिका होती. रणबीरचे आजोबा आणि दिवंगत अभिनेते शम्मी कपूर यांचा 'रॉकस्टार' हा शेवटचा सिनेमा होता. शम्मी यांनी शहनाई वादकाच्या छोट्याश्या भूमिकेत चांगलीच छाप पाडली.

# इंडो-अमेरिकन चित्रपटात मनोज वाजपेयी झळकणार



प्रसिद्ध दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांचे अनेक चित्रपट सुपरिंजर या चित्रपटानंतर मनोज वाजपेयी अभिनेता फ्रँक लँगेलासोबत एका आंतरराष्ट्रीय चित्रपटात काम करणार होते, परंतु हा प्रोजेक्ट पूर्ण होऊ शकला नव्हता. दोन दशकांपेक्षा अधिक काळानंतर मनोज वाजपेयींनी स्वत:च्या फिल्मोग्राफीत एक इंडो-अमेरिकन चित्रपट जोडला आहे.

मनोज आता अमेरिकन चित्रपट निर्मात्या बेन रेखी यांच्याकडून दिग्दर्शित एका चित्रपटात काम करणार आहे. या चित्रपटाची निर्मिती राणा दग्गुबातीचे प्रॉडक्शन हाउस स्पिरिट मीडियाने केली आहे. मनोजचा हा पहिला इंडो-अमेरिकन चित्रपट असणार आहे. बेन रेखी यांनीच याची कहाणी लिहिली आहे.

चित्रपटाची कहाणी परिवाराच्या यात्रेच्या माध्यमातून सामाजिक मुद्द्याला स्पर्श करणार आहे. या चित्रपटात मुंबईतील कलाकारांना स्थान देण्यात आले आहे. या चित्रपटात मनोज एका सामान्य माणसाची भूमिका साकारत आहे, ज्याचा परिवार संकटात सापडतो आणि त्याला एका मुद्द्यासाठी लढावे लागते. या चित्रपटाला लवकरच प्रदर्शित केले जाणार असल्याचे निर्मात्यांकडून सांगण्यात आले.

# एम.एस. धोनीचे अभिनय क्षेत्रात पदार्पण?

चेन्नई सुपर किंग्जचा कर्णधार क्रिकेटपटू एमएस धोनी एका नव्या अंदाजात प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. धोनीने अभिनय क्षेत्रात पदार्पण केल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. चित्रपट निर्माता करण जोहरच्या आगामी प्रोजेक्टमध्ये एमएस धोनी 'लव्हर बॉय'ची भूमिका साकारणार आहे. याची हटके झलक करणने इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ शेअर करत दिली आहे. यातून धोनीचा एक नवीन लूक आणि अवतार समोर येणार आहे. करणने शेअर केलेल्या व्हिडीओत क्रिकेटपटू एमएस धोनी रोमँटिक अंदाजात दिसत आहे. व्हिडीओच्या सुरूवातीलाच 'पहिल्यांदाच एमएस धोनी रोमँटिक अवतारात' असे लिहिलेले पाहायला मिळत आहे. तो म्हणतो की, तू सोबत असतेस तेव्हा प्रत्येक प्रवास सुंदर बनतो. व्हिडीओमध्ये धोनीच्या हातात हार्टच्या आकाराचा फुगा पाहायला मिळत आहे. चाहते धोनीला नव्या भूमिकेत पाहण्यासाठी आतुर आहेत. दरम्यान, एमएस धोनी करण जोहरच्या नवीन जाहिरातील दिसणार आहे. याची एक झलक करणने चाहत्यांसोबत शेअर केली आहे. याआधी देखील धोनीने अनेक जाहिरातीमध्ये काम केले आहे. मात्र ही जाहिरात खास असणार आहे. कारण यात धोनीचा रोमँटिक अंदाज पाहायला मिळणार आहे. एमएस धोनीचा हा व्हिडिओ म्हणजे एका कंपनीची जाहिरात आहे. ही व्हिडिओ क्लिप बॉलीवूड चित्रपटातील वाटत असल्याने धोनी अभिनय क्षेत्रात पदार्पण करणार अशी चर्चा आहे.




# रोहित शेट्टीच्या 'ॲक्शनियर'मध्ये जॉन अब्राहम



जॉन अब्राहमने त्याच्या चित्रपटांमध्ये पोलिस अधिकाऱ्याची भूमिका साकारली आहे, तर रोहित शेट्टी त्याच्या कॉप युनिव्हर्स चित्रपटांसाठी देखील प्रसिद्ध आहे. आता जॉन आणि रोहित एकत्र आले आहेत. रोहितच्या पुढच्या चित्रपटात जॉन अब्राहम एका पोलिस अधिकाऱ्याची भूमिका साकारणार आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण लवकरच सुरू होणार आहे. रोहित शेट्टीच्या आगामी चित्रपटाचे नाव 'ॲक्शनियर' असल्याचे सांगितले जात आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण सुमारे चार महिने चालेल. रोहितच्या चित्रपटाचे चित्रीकरण मुंबईतील ४० वेगवेगळ्या ठिकाणी केले जाईल. काही मीडिया रिपोर्ट्सनुसार, रोहित आणि जॉन अब्राहम १८ एप्रिलपासून 'ॲक्शनियर' चित्रपटाचे शूटिंग सुरू झाली आहे. काही काळापूर्वी जॉन अब्राहमने दिलेल्या मुलाखतीत सांगितले होते की, तो रोहित शेट्टीचा चित्रपट करत आहे आणि त्याची कथा खूप खास आहे. आता बातमी अशी आहे की रोहित शेट्टी मुंबईचे माजी पोलिस आयुक्त राकेश मारिया यांच्या जीवनावर आधारित हा चित्रपट बनवत आहेत. या चित्रपटात १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटांच्या तपासापासून ते २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यांपर्यंतची कथा दाखवण्यात येईल. या चित्रपटात जॉन मुख्य भूमिका साकारणार आहे. अलीकडेच, जॉन अब्राहमने त्याच्या 'डिप्लोमॅट' चित्रपटाचे प्रमोशन करताना सांगितले होते की त्याला शाहरुख खानच्या 'पठाण' चित्रपटाचा प्रीक्वल हवा आहे. या प्रीक्वेलमध्ये, त्याच्या जिम या पात्राची कथा तपशीलवार दाखवता येईल. 'पठाण' मध्ये जॉनने जिम नावाच्या खलनायकाची भूमिका साकारली होती.




# ‘एल २: एम्पुरान’ मल्याळमचा सर्वाधिक कमाई करणारा सिनेमा

मोहनलाल अभिनीत मल्याळम चित्रपट ‘एल २: एम्पुरान‘ जगभरातील बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी करत आहे. पृथ्वीराज सुकमारन दिग्दर्शित हा चित्रपट प्रदर्शित होण्याच्या दुसऱ्या आठवड्यात आहे. ॲक्शनने भरलेला "L2: एम्पुरान' हा पृथ्वीराजच्या ‘लुसिफर' चा सिक्वेल आहे. चित्रपट निर्मात्यांचा असा दावा आहे की हा चित्रपट सर्वाधिक कमाई करणाऱ्या मल्याळम चित्रपटांपैकी एक बनला आहे. "L2: Emrran' हा चित्रपट २७ मार्च रोजी पाच भाषांमध्ये चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. चित्रपट निर्मात्यांचा असा दावा आहे की हा चित्रपट जगभरातील बॉक्स ऑफिसवर सर्वाधिक कमाई करणाऱ्या मल्याळम चित्रपटांपैकी एक बनला आहे. याबद्दल, आशीर्वाद सिनेमाजने सोशल मीडियावर एक अपडेट शेअर केले आहे. एक्सवरील पोस्टमध्ये लिहिले आहे की, एम्पुरान आता मल्याळम चित्रपटाच्या इतिहासातील सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट बनला आहे. ही पोस्ट पृथ्वीराज सुकुमारन यांनीही शेअर केली आहे. तथापि, निर्मात्यांनी कोणता चित्रपट ‘एम्पुराण' ला मागे टाकून आतापर्यंतचा सर्वाधिक कमाई करणारा मल्याळम चित्रपट बनला आहे याबद्दल कोणतीही माहिती उघड केलेली नाही. तसेच त्यांनी लूसिफरच्या सिक्वेलचे जगभरातील बॉक्स ऑफिसचे आकडेही उघड केलेले नाहीत. सॅकनिल्कच्या मते, आतापर्यंत एम्पूरनचा जगभरातील संग्रह २३६.२५ कोटी रुपये होता तर मंजुम्मेल बॉईजने एकूण २४१.०३ कोटी रुपये कमावले. "L2: Emrraan' हा चित्रपट मल्याळम चित्रपटसृष्टीतील सर्वात महागड्या चित्रपटांपैकी एक मानला जातो. या चित्रपटात २००२ च्या गुजरात दंगलींची कहाणी दाखवण्यात आली आहे. उजव्या विचारसरणीचे लोक यावर टीका करत आहेत. चित्रपटावरील वादानंतर, चित्रपटातून अनेक दृश्ये काढून टाकण्यात आली आणि अनेक संवाद म्यूट करण्यात आले.

# रजनीकांतला ‘हा’ अभिनेता द्रोणाचार्य समजतो



दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीसह हिंदी चित्रपटसृष्टीत रजनीकांत हे एक फार मोठं नाव आहे. रजनीकांत यांनी आजपर्यंत अनेक हिट चित्रपट दिले आहेत. आता सुपरस्टार रजनीकांत यांचा 'कुली' हा चित्रपट त्याच्या घोषणेपासून सतत चर्चेत आहे. चित्रपटाबद्दल लोकांमध्ये प्रचंड उत्साह आहे. या चित्रपटातील रजनीकांत यांचा सह- कलाकार उपेंद्र याने केलेले रजनीकांत यांच्याबद्दलचे वक्तव्य सध्या खूपच चर्चेत आहे. उपेंद्र याने स्वतःला एकलव्य तर रजनीकांतला द्रोणाचार्य म्हटले आहे. त्याच्या कुली या आगामी चित्रपटातील रजनीकांतसोबत काम करण्याचे अनुभव त्याने शेअर केले आहेत. कन्नड स्टार उपेंद्र सुपरस्टार रजनीकांत यांच्या आगामी 'कुली' चित्रपटात काम करण्यास उत्सुक आहे. अलीकडेच या अभिनेत्याने रजनीकांतसोबत काम करण्याच्या त्याच्या उत्साहाबद्दल आणि अनुभवाबद्दल सांगितले. त्याने सांगितले की दिग्दर्शकांनी जेंव्हा त्याला रजनीकांतसोबत काम करण्यासाठी विचारले तेंव्हा मी एकदाही विचार केला नाही आणि लगेच चित्रपट करण्यास होकार दिला. उपेंद्र सध्या त्याच्या आगामी '४५' चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. यावेळी, एका प्रमोशनल इव्हेंटमध्ये, अभिनेता म्हणाला, जेव्हा मला रजनीकांतसोबत काम करण्याची संधी मिळाली, तेव्हा मी क्षणभरही मागेपुढे पाहिले नाही. लोकेश कनागराज स्वतः आले आणि मला गोष्ट सांगितली. रजनीकांतच्या शेजारी उभे राहणेही माझ्यासाठी पुरेसे होते. रजनी यांनी मला प्रेरणा दिली.



# ‘स्पिरिट’साठी प्रभासचा खास अवतार

ॲनिमल चित्रपटाच्या यशानंतर दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगा त्यांचा आगामी स्पिरिट चित्रपट घेऊन येणार आहेत. या चित्रपटावर काम सुरू झाले असून दाक्षिणात्य अभिनेता प्रभास या चित्रपटात मुख्य भूमिकेत असणार आहेत. हा चित्रपट पोलिसांवर आधारित ॲक्शन थ्रिलर स्पस्पेन्स चित्रपट असणार आहे. या चित्रपटात प्रभास स्टंट करताना पाहायला मिळणार आहे. चित्रपटाची शूटिंग ऑक्टोबर महिन्यापासून सुरू होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. संदीप रेड्डी यांना वांगा ‘स्पिरिट'साठी एका खास पद्धतीने चित्रीकरण करणार आहेत. चित्रपटात अनेक स्टंट सीन असल्याने प्रभासला यावर प्रचंड मेहनत घ्यावी लागणार आहे. त्यामुळे वांगा यांनी प्रभासाला आपल्या शरीरावर मेहनत घेण्याचा सल्ला दिला असून प्रभासने हा सल्ला स्विकारला आहे. त्यानुसार त्याने शरीरावर मेहनत करायला सुरुवात केली आहे. तसेच या चित्रपटातील प्रभासच्या भूमिकेवर विशेष मेहनत देखील घेतली जाणार आहे. स्पिरिटच्या शूटिंगपूर्वी, प्रभास त्याच्या ‘राजा साब' आणि ‘फौजी' चित्रपटाच्या शड्युलमध्ये व्यस्त आहे. स्पिरीटमध्ये अमेरिका आणि कोरियामधील कलाकारही काम करू शकतात. येत्या काही महिन्यांमध्ये स्पिरिटच्या कास्टिंगबद्दल माहिती दिली जाणार आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण झाल्यानंतर वांगा हे ॲनिलम पार्कसाठी लेखन प्रक्रिया सुरू करणार आहेत.






# 'देऊळ बंद २'ची झाली घोषणा

२०१५ साली आलेला 'देऊळ बंद' सिनेमा खूप गाजला होता. गश्मीर महाजनने सिनेमात नासाचा वैज्ञानिक राघव शास्त्रीची भूमिका साकारली होती. देवलाच आव्हान देणाऱ्या राघवला नंतर कसा साक्षात्कार होतो अशी ती गोष्ट होती. प्रवीण तरडेंनी सिनेमाचं दिग्दर्शन केलं होतं. त्याचवेळी देऊळ बंद २ चीही संकल्पना फायनल झाली होती. नुकतंच 'देऊळ बंद २' च्या शूटिंगला सुरुवात झाली आहे. यानिमित्ताने अभिनेता गश्मीर महाजनीने यावर प्रतिक्रिया दिली आहे. एका मुलाखतीत गश्मीर महाजनी म्हणाला, देऊळ बंद २ तेव्हाच लिहिला गेला होता. तो सिनेमा शेतकऱ्यांवर असणार आहे. त्यामुळे त्यात राघव शास्त्री नासाचा सायंटिस्ट फिट बसत नाही. म्हणून मी सिनेमात दिसणार नाही. मात्र बाकी सगळी सिनेमाची टीम तीच आहे. माझी लाडकी टीम आहे. प्रवीण तरडे, निर्माते त्यांना सगळ्यांनाच माझ्याकडून भरभरून शुभेच्छा. सगळे छानच करतील त्यात काही शंका नाही. गश्मीर महाजनीला 'देऊळ बंद'मुळेच लोकप्रियता मिळाली होती. 'देऊळ बंद २: आता परीक्षा देवाची' टायटलची घोषणा झाली आहे. यामध्ये शेतकऱ्यांचा संघर्ष दाखवण्यात येणार आहे. यामध्येही मोहन जोशी स्वामी समर्थांच्या भूमिकेत दिसणार आहेत. प्रवीण तरडेंन लॉकडाऊनमध्येच दुसऱ्या भागाची कथा लिहिली होती. पुढील वर्षी सिनेमा रिलीज होण्याची शक्यता आहे.

# अमृता सुभाषचा 'जारण'मध्ये हटके लूक !



हृषीकेश गुप्ते दिग्दर्शित 'जारण' या भयपटाचे पोस्टर काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झाले. पोस्टर बघून प्रेक्षकांच्या मनात अनेक प्रश्न पडले असतानाच आता या चित्रपटातील एक चेहरा समोर आला आहे. या चित्रपटात चौकटीबाहेर जाऊन आव्हानात्मक भूमिका साकारणारी अभिनेत्री अमृता सुभाष महत्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहे. 'जारण' हा मानवी भावना आणि दुहेरी आयुष्याचा शोध घेणारा प्रवास असून यात अनेक रहस्ये लपली आहेत, जी प्रेक्षकांना थरारक अनुभव देतील. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या पोस्टरमध्ये अमृता सुभाषच्या चेहऱ्यावर टाचण्या टोचलेल्या दिसत असून डोळे बरंच काही सांगण्याचा प्रयत्न करत आहेत. आता हे रहस्य चित्रपट आल्यावरच उलगडणार आहे. या भूमिकेबद्दल अमृता सुभाष म्हणते, मला नेहमी असे वाटते की कलाकाराने एका विशिष्ट प्रकारच्या भूमिकेपुरताच मर्यादित राहू नये. मला नेहमीच प्रयोगशील राहायला आवडते. माझ्या इतर भूमिकांच्या तुलनेत अशी भूमिका मी आजवर कधीच साकारली नव्हती. ही भूमिका माझ्यासाठी तशी आव्हानात्मक होती. परंतु दिग्दर्शक आणि माझ्या सहकलाकारांच्या साहाय्याने माझे हे काम सोपे झाले. ज्यावेळी मी 'जारण'चे स्क्रिप्ट वाचले तेव्हाच हा चित्रपट करण्याचे ठरवले. माझ्या भूमिकेबद्दल मी आता जास्त काही सांगणार नाही, मात्र हे आवर्जून सांगेन, ही एक अशी रहस्यमय कथा आहे, जी प्रेक्षकांना खुर्चीला खिळवून ठेवेल. 'जारण' चित्रपट येत्या ६ जून रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन हृषीकेश गुप्ते यांनी केले असून अमोल भगत आणि नितीन भालचंद्र कुलकर्णी 'जारण'चे निर्माते आहेत.



# रंजनासोबत माझी चांगली जोडी जमली होती

महाराष्ट्र भूषण अशोक सराफ यांनी त्यांच्या कारकिर्दीत अनेक सुपरहिट सिनेमे दिले आहेत. आजही ते प्रेक्षकांचं मनोरंजन करत आहेत. मराठीसोबतच त्यांनी हिंदी सिनेसृष्टीही गाजवली. मनोरंजनविश्वातील या महानायकाने अनेक अभिनेत्रींसोबत काम केलं आहे. सिनेमांमध्ये त्यांची अनेक अभिनेत्रींसोबत गट्टी जमली. पण, या सगळ्यात रंजना देशमुख या अशोक मामांच्या आवडत्या अभिनेत्री होत्या. अलिकडेच दिलेल्या मुलाखतीत त्यांनी याबद्दल खुलासा केला होता. अशोक सराफ यांना मुलाखतीत त्यांना तुमची आवडती ऑनस्क्रीन जोडी कोणती? असा प्रश्न विचारण्यात आला. यावर उत्तर देताना अशोक सराफ म्हणाले, खरं सांगायचं तर माझी चांगली जोडी जमली ती रंजनासोबत. ती एक फाइन आर्टिस्ट होती, यात शंकाच नाही. मेहनती कलाकार होती. आपल्याला ही गोष्ट जमत कशी नाही, मी ती करणार...असा तिचा ध्यास सतत असायचं. एवढा जेवढा तुमचा ध्यास असतो तेव्हाच तुम्ही यशस्वी होता. म्हणून ती यशस्वी झाली. तिने सुरुवातीला केलेले सिनेमे मी पाहिले आहेत. ते सिनेमे तिने का केले, असे होते. पण, नंतर तिने स्वत:ला खूप डेव्हलप केले. इंडस्ट्रीत आमच्या जोडीचे जास्त सिनेमे झाले. त्या वेळेला तिची आणि माझी जोडी जमली होती. दरम्यान, अशोक सराफ अशी ही जमवाजमवी सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला आले आहेत. या सिनेमात त्यांच्यासोबत वंदना गुप्ते मुख्य भूमिकेत आहेत. १० एप्रिलला हा सिनेमा सर्वत्र प्रदर्शित झाला आहे. सुनील बर्वे, चैत्राली गुप्ते, मिलिंद फाटक, सुलेखा तळवलकर, पुष्कराज चिरपुटकर, ओमकार कुलकर्णी, तनिष्का विशे अशा लोकप्रिय कलाकारांची सिनेमात फौज आहे.

# अशांत शोक नायिका: मीनाकुमारी



**भारतीय चित्रपटसृष्टीच्या कलासागराचे मंथन केल्यास बोटावर मोजता येतील इतकेच कलाकार रत्ने म्हणून हाती लागतील. या कलाकारांचा कलाविलास ज्याप्रमाणे मधमाशी अनेक फुलांतील मध थेंबा थेंबांनी गोळा करते व पोळ्याच्या रूपात सुरेख आकृतिबंध तयार करते तसा असतो. शांत स्वभावाच्या व गंभीर मुद्रेच्या मीनाकुमारीची अभिनय कला याच प्रकारात मोडते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर चित्रपटाचे नवीन युग ज्यांनी सुरू केले त्या स्त्री कलाकारात नरगिस, मधुबाला व मीनाकुमारी या प्रमुख होत. शोकांत नायिकेच्या वा स्त्री शोषणाच्या भूमिका मीनाकुमारीने अजरामर केल्यात.**

लग्नाआधी खूशरंग व उदात्त जीवनाची स्वप्ने रंगवणार्या मीनाकुमारीचे आयुष्य लग्नानंतर काही वर्षांतच उद्ध्वस्त झाले. यालाही कारणीभूत नकळत ती स्वतःच होती. वयाने १४ वर्षांने मोठ्या व चार अपत्ये असणाऱ्या विवाहित कमाल अमरोही या निर्माता- दिग्दर्शकाच्या प्रेमात पडून विवाह केला. पौगंडावस्थेत फुटलेला प्रेमाचा अंकुर हमखास रुजेल याची खात्री नसते. मीनाच्या बाबतीत असेच झाले. मीनाकुमारीचे शालेय शिक्षण जेमतेम असूनही ती कविमनाची असल्यामुळे तिने अनेक गझल स्वरूप काव्ये उर्दूतून लिहिलीत. आपल्या जीवनातील व्यथा तिने काव्यबद्ध केल्या. काव्यात ती विषाद व दुःखाचाच उल्लेख करते. नैराश्येचे जीवन नशिबी आल्यामुळे की काय स्त्री जीवनाच्या व्यथा व अगतिकता सांगणाऱ्या शोकांतिक नायिका पडद्यावर सादर करणे तिला जमले. कारण त्या भूमिकेत ती जगत होती.

भारतीय नारीची अनेक परंपरागत सोशिक रूपे तिने साकारली. १९५२ सालच्या 'बैजू बावरा'तील गौरी ते १९७२ सालच्या 'पाकिजा'तील साहेबजान हा तिचा खर्या अर्थी चित्रपट प्रवास आहे. तिने साकारलेल्या विविध भूमिकेच्या अंतरंगात प्रवेश करू- १९५२ साली 'बैजू बावरा' या पहिल्याच मान्यताप्राप्त चित्रपटात निरामय निरागस प्रेमिका गौरीची भूमिका इतकी सज्जड निभावली की, तिच्या अभिनयासाठी नुकतेच १९५२ साली सुरू झालेले फिल्म फेअर अवॉर्ड मिळाले. हा अवॉर्ड मिळविणारी ती पहिली अभिनेत्री ठरली. 'गोरे गोरे हाथों में मेहंदी रचाके' या गाण्यात मीनाच्या चेहर्यावरील घालमेल, आईवडिलांची होणारी तातटूट, पण मैत्रिणींनी रंगविलेले नटखट भावस्वप्न याचे संमिश्र भाव बेमालूम वठविली. १९५३ साली 'दो बिघा जमीन' या नावाजलेल्या चित्रपटात बिमल रॉय यांनी छोट्याशा भूमिकेतून मीनाच्या अभिनयाचा लाभ उठविला.

१९५५ साली बी. आर. चोप्राच्या 'एक ही रास्ता' या बोलपटात पतिव्रता व पुनर्विवाहित स्त्रीचे आयुष्य मीनाकुमारीने अफलातून पद्धतीने अभिनित केले. 'आझाद' चित्रपटात दिलीप कुमारसोबत शोकनायिकेच्या प्रतिमेपासून हटके विनोदी ढंगाची भूमिका खेळकरपणे अभिनित करून बहुआयामिकत्व उजागर केले. १९५७ साली 'शारदा' चित्रपटात तर तिला अभिनयाचे सारे पदर उलगडावे लागले. ज्याच्यावर ती प्रेम करते त्या नायकाला वगळून गरीब परिस्थितीमुळे चक्क नायकाच्या वडिलांसोबत विवाह करावा लागतो. यात राज कपूर तिचा नायक असतो. १९५८ साली 'यहुदी' चित्रपटात यहुदी मुलीची वेगळ्याच धर्तीची भूमिका केली. 'चार दिल चार राहे' या १९५९ सालच्या चित्रपटात अस्पृश्य स्त्रीच्या जीवनातील सर्व कंगोरे मीनाकुमारीने अभिनित केले. 'दिल अपना और प्रीत परायी' या १९६० च्या चित्रपटात स्वतःच्या प्रियकराचे लग्न दुसरीसोबत होताना, त्याच्या खुशीसाठी स्वतःच्या मनाचा कोंडमारा लपवून चेहऱ्यावर खोटी खुशी आणण्याचा कठीण अभिनय मीनाकुमारीने अप्रतिम करून आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले. 'भाभी की चुडिया' चित्रपटात मोठ्या वहिनीची कर्तव्यपरायणता, 'आरती' चित्रपटात कृतघ्न प्रियकराची प्रतारणा करणारी डॉक्टर स्त्री अफलातून साकारली. 'साहिब बीबी और गुलाम'मधील छोटी बहूच्या अजरामर भूमिकेला कोण विसरेल? 'चित्रलेखा' नामक पोषाखी चित्रपटात राजनर्तकीची भूमिका सर्वार्थाने सार्थ केली. 'मै चूप रहूंगी' चित्रपटात मुक्या मनाने शब्दांचे बुडबुडे उडवणारे भाव चेहऱ्यावर प्रकट करून अभिनयाची सर्वोच्च उंची गाठली. 'कोहिनुर' चित्रपटात दिलीप कुमारसोबत होळी खेळताना 'तन रंगलो जी, अजी मन रंगलो' या गाण्यात बाह्यरूपच नव्हे, तर अंतर्मनही रंगात भिजले, असे सज्जड अभिनयाने अभिनित केले. ही किमया मीनाच करू शकते!

'दिल एक मंदिर' चित्रपटात मीनाने अभिनयाचे सारे रेकॉर्ड मोडीत काढले. कॅन्सर झालेल्या नवऱ्याच्या पतिव्रता स्त्रीची भूमिका निभावताना तिच्या चेहऱ्यावरील भाव नेत्रातील कारुण्य व अगतिक ता दर्शविण्याचा अभिनय सध्याच्या काळातील स्त्री कलाकारांनी शिकावा, असा आहे. अभिनयाची ती एक पाठशाळाच होती. 'तोरा मन दर्पण कहलाये सुख की कलिया दुख के काटे मन मे नैन हजार...' गुलशन नंदाच्या कथानकावरील साहिरने लिहिलेले 'काजल' चित्रपटातील हे गाणे मीनाने भावपूर्ण अभिनयाने अजरामर केले. हे गाणे तिच्या वैयक्तिक जीवनाचे जणू वर्णनच होते.

मीनाकुमारीने जवळपास १०० चित्रपटांमधून कामे केली आहेत. १९७२ साली 'पाकिजा' या शेवटच्या चित्रपटातील साहेबजानची भूमिका तिच्या मरणोपरांतही लक्षात राहणारी आहे. १ ऑगस्ट १९३२ रोजी महजबीन उर्फ मीनाकुमारीचा जन्म झाला. मास्टर अलिबक्ष हे तिचे वडील होते. १९५२ साली तिचा विवाह झाला व अवघ्या दोन-तीन वर्षांतच वैवाहिक आयुष्य दुःखदायक झाले. विचारांची वारी विवेकाच्या वळणावरून घसरली व विपुल मंथनानंतर १९६४ साली घटस्फोट झाला. दैवी नैराश्येच्या गर्तेतून निघालेले अश्रू अंतःकरणातून उगम पावतात व डोळ्यात जमा होतात. अशा पाणावलेल्या नेत्रातून तिने काव्ये रचली. तिने रचलेली काव्ये, तिचे वैयक्तिक जीवन हा प्रदीर्घ कादंबरीचा विषय आहे. दरम्यानच्या काळात उदासीनतेच्या व वैफल्याच्या गर्तेत तिला मद्यपानाने घेरले. सिरोसिस ऑफ लिव्हर हा आजार जडला. चार फिल्म फेअर मिळालेली व चित्रपट जगतात भरपूर योगदान देणारी ही महान कलाकार ३१ मार्च १९७२ रोजी पैगंबरवासी झाली... 'अजीब दास्ता है ये कहाँ शुरु कहाँ खतम...!'

**रमेश पोफळी**

# अक्षय खन्ना करणार राजकारणात एन्ट्री?



'छावा' सिनेमाची चांगलीच चर्चा झाली. १४ फेब्रुवारी २०२५ ला रिलीज झालेला 'छावा' सिनेमा अनेकांना आवडला. २०२५ चा सर्वात जास्त कमाई करणारा सिनेमा म्हणून 'छावा' सिनेमाकडे पाहिलं जातंय. 'छावा' सिनेमात औरंगजेबाची भूमिका साकारणार्या अक्षय खन्नाचं चांगलंच कौतुक झालं. अक्षय खन्नाने औरंगजेब जणू मोठ्या पडद्यावर जिवंत केला. अक्षय खन्नाचे बाबा विनोद खन्ना हे राजकारणात सक्रीय होते. बाबांप्रमाणे राजकारणात एन्ट्री करणार का? असं विचारल्यावर अक्षय खन्ना काय म्हणाला? अभिनेता अक्षय खन्नाची एक जुनी मुलाखत व्हायरल झाली आहे. या मुलाखतीत वडीलांप्रमाणे अक्षय सुद्धा भविष्यात कधी राजकारणात एन्ट्री करणार का? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावेळी अक्षय खन्ना म्हणाला की, एक सामान्य नागरीक म्हणून मी रोज वर्तमानपत्र वाचतो. टीव्ही पाहतो. आजूबाजूच्या घडामोडींचा मी आढावा घेतो. आपल्या आसपास काय सुरु आहे, याविषयी मला माहिती आहे. परंतु राजकारणात मी प्रवेश करु इच्छित नाही. मला राजकारणात यायचा अजिबात रस नाही. अशाप्रकारे अक्षयने त्याचं मत व्यक्त केलं. 'छावा' सिनेमाचं दिग्दर्शन लक्ष्मण उतेकर यांनी केलं होतं. या सिनेमात विकी कौशलने छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारली. रश्मिका मंदानाने महाराणी येसूबाईंची भूमिका साकारली. याशिवाय औरंगजेबाच्या भूमिकेत अक्षय खन्ना दिसला. अक्षयने साकारलेल्या क्रूर, मग्रूर औरंगजेबाच्या भूमिकेचं चांगलंच कौतुक झालं. अक्षय आता लवकरच आगामी साऊथ सिनेमात भूमिका करताना दिसणार आहे. सर्वांना अक्षयच्या या आगामी सिनेमाची उत्सुकता आहे



# अल्फात आलिया, शर्वरीचा ॲक्शन अवतार!

आलिया भट आणि शर्वरी या दोन्ही अभिनेत्री अल्फा नावाच्या चित्रपटातून एका अनोख्या भूमिकेत पाहायला मिळणार आहेत. या चित्रपटात आलिया आणि शर्वरी ॲक्शन करताना पाहायला मिळणार आहेत. ॲक्शन डायरेक्टर क्रेग मॅकक्रे यांच्याकडून ॲक्शनचे प्रशिक्षण या दोघी घेत आहेत. यासाठी त्या खूप मेहनत घेत आहेत. त्यांच्या मेहनतीचे कौतुक मॅकक्रेने केले आहे. अल्फा हा चित्रपट एक ॲक्शन चित्रपट असणार आहे. या चित्रपटात आलिया आणि शर्वरीला प्रशिक्षण देणारे ॲक्शन डायरेक्टर क्रेग मॅकक्रेने चित्रपट आणि अभिनेत्रीशी संबंधित काही गोष्टी शेअर केल्या आहेत.

ॲक्शन डायरेक्टरने सांगितले की, सुरुवातीला दोन्ही अभिनेत्रींनी या चित्रपटात घेणार नव्हते. मात्र, दोन्ही अभिनेत्रींची मेहनत पाहून मॅकक्रेने आलिया आणि शर्वरी यांना या चित्रपटात कास्ट केले, असा खुलासा त्याने केला आहे. क्रेग मॅकक्रे बऱ्याच काळापासून बॉलिवूड आणि हॉलिवूड चित्रपटांमध्ये ॲक्शन सीनच्या डिरेक्शनचे काम करत आहेत. त्याने टायगर श्रॉफ, शाहरुख खान आणि अक्षय कुमारसारख्या कलाकारांच्या चित्रपटांसाठी ॲक्शन सीन्स तयार केले आहेत. त्यामुळे अल्फामध्ये आलिया आणि शर्वरीचे ॲक्शन सीन्स पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत. अल्फा चित्रपटाचे ॲक्शन डायरेक्टर क्रेग मॅकक्रे म्हणाला, हा माझा पहिला बॉलिवूड चित्रपट आहे, ज्यामध्ये दोन महिला मुख्य भूमिकेत आहेत.

सुरुवातीला मला थोडीशी खात्री नव्हती, कारण महिला प्रमुख भूमिका असलेला ॲक्शन चित्रपट अभिनेत्रींच्या कठोर परिश्रम आणि इच्छाशक्तीवर अवलंबून असतो. आलिया आणि शर्वरीचे कौतुक करताना दिग्दर्शक म्हणाला, चित्रपट सुरू होण्यापूर्वी आलिया आणि शर्वरीने ३ महिने प्रशिक्षण घेतले. त्या दोघींसोबत काम करणे खूप मजेदार आणि प्रेरणादायी होते. दोघेही केवळ मेहनती नाहीत तर खूप चांगली माणसे देखील आहेत, असे त्याने सांगितले.

# सलमानच्या किक-२ मध्ये रणदिप दिसणार



ईदच्या दिवशी बॉलीवूडचा भाईजान सलमान खानचा बहुचर्चित सिंकदर हा चित्रपट रिलीज झाला. या चित्रपटाचे मोठ्या प्रमाणावर प्रमोशन करण्यात आले. मात्र, चित्रपट बॉक्स ऑफिसवर फार काही कमाल करू शकला नाही. सुरुवातीचे काही दिवस सिंकदरला बऱ्यापैकी प्रेक्षकवर्ग मिळवता आला. मात्र, त्यानंतरच्या दिवसांमध्ये सिंकदरला प्रेक्षकांचा संमिश्र प्रतिसाद मिळाला. आता सलमानच्या किक २ चित्रपटाची चर्चा सुरू झाली आहे. किक या चित्रपटाने इतिहास रचत बॉक्स ऑफिसवर धूमाकूळ घातला होता. त्यामुळेच या चित्रपटाच्या दिग्दर्शक निर्मात्यांनी याचा पुढचा भाग आणण्याचे ठरवले आहे. लवकरच या चित्रपटावर काम करण्यास सुरूवात होणार आहे

किक २ मध्ये अभिनेता रणदीप हुडा दिसणार का अशी देखील चर्चा सोशल मीडियावर रंगू लागली आहे. किकचे निर्माते साजिद नाडियाडवाला यांनी किक २ चित्रपटावर काम करण्यास लवकरच सुरूवात होईल, असे सांगितले होते. तेव्हापासून या चित्रपटाविषयीच्या चर्चांना वेग प्राप्त झाला होता. किकमध्ये अभिनेता रणदिपने एका पोलीस अधिकाऱ्याची भूमिका केली होती. यामुळे रणदिप किक २ चा हिस्सा होणार का असा प्रश्न शुभंकर मिश्राने रणदिपला विचारला होता. मिश्राने रणदिपला पॉडकास्टमध्ये किक २ विषयी विचारणा केली. तसेच या चित्रपटात त्याची काय भूमिका असणार असा थेट प्रश्न केला. यावर, ते मला माहित नाही म्हणत किक २ येणार आहे, पण तो कधी येणार हे आम्हाला माहित नाही. साजिद भाई यात जास्त गुंतलेले आहेत, असे उत्तर रणदिपने दिले. या चित्रपटाचा मी एक भाग असणार का याबद्दल मला माहिती नाही. पण यावर विचार करत असल्याचे रणदिपने सांगितले.

# शर्मिला टागोर दोन दशकांनंतर रुपेरी पडद्यावर

अभिनेत्री सोहा अली खानने तिच्या 'पुरातन' या चित्रपटात तिची आई म्हणजेच अभिनेत्री 'शर्मिला टागोर' यांचे कौतुक केले. तिच्या इंस्टा फॅमिलीला आपल्या सिनेमातील शर्मिला टागोरची काही झलक दाखवत सोहाने लिहिले, पुरातनमध्ये अम्माचा उत्सव साजरा करत आहे, जवळजवळ दोन दशकांनंतर बंगाली चित्रपटसृष्टीत तिचे भव्य पुनरागमन, जसे कोणीतरी मला एकदा सांगितले होते, आमच्यासाठी शर्मिला ही एक व्यक्ती नाही तर एक भावना आहे! असं तिने लिहिलं आहे.

दरम्यान, पुरातन हा चित्रपट या ज्येष्ठ अभिनेत्रीचे बंगाली चित्रपटसृष्टीत खूप दिवसांनी पुनरागमन दर्शवितो, ज्यामुळे



हा चित्रपट आणखी खास बनतो. चित्रपटाची कथा रितिका (ऋतुपर्णा सेनगुप्ता) आणि तिचा नवरा राजीव (इंद्रनील सेनगुप्ता) यांच्याभोवती फिरते, जे तिच्या आईचा (शर्मिला टागोर) ८० वा वाढदिवस साजरा करण्यासाठी पश्चिम बंगालमधील त्यांच्या वडिलोपार्जित घरी परततात. त्यांच्या परतल्यानंतर, रितिकाला कळते की तिच्या आईला स्मृतीभ्रंशाचा त्रास होतो, ज्यामुळे तिला या नवीन वास्तवाचा कसा सामना करावा लागतो, हे दाखविले आहे.

सुमन घोष दिग्दर्शित हा चित्रपट ११ एप्रिल २०२५ रोजी प्रदर्शित झाला. सोहाचा हॉरर कॉमेडी 'छोरी २' त्याच दिवशी थिएटरमध्ये दाखल झाला.

दरम्यान, सोहाने अलीकडेच दिलेल्या एका खास मुलाखतीत तिच्या मनातल्या भीतींबद्दल उघडपणे सांगितले आहे. अभिनेत्रीने खुलासा केला की, तिला सर्वात जास्त भीती वाटते ती म्हणजे प्रियजनांच्या अकाली निधनाची. सोहा म्हणाली, मी माझ्या खूप जवळचे लोक गमावले आहेत, ज्यांना मी खूप प्रेम करते. म्हणून, मला माहित आहे की ते जीवनाचा एक भाग आहे. ते असे काहीतरी आहे ज्याची मला भीती वाटते.



# ब्रेकअपनंतर 'ही' जोडी पुन्हा एकत्र

'बिग बॉस'च्या १४ व्या पर्वात सहभागी झालेली अभिनेत्री पवित्रा पुनिया आणि अभिनेता एजाज खान काही काळापुर्वी एकमेकांपासून वेगळे झाले. दोघेजण शोमध्ये एकमेकांना भेटले. शोमध्ये असताना दोघांमध्ये खूप भांडणं झाली, पण नंतर हळूहळू हे भांडण प्रेमात बदललं. 'बिग बॉस'च्या घरातून बाहेर पडल्यानंतर दोघं एकमेकांना डेट करू लागले. पवित्रा पुनिया आणि एजाज खान यांनी काही काळ एकत्र वेळ घालवल्यानंतर एकमेकांपासून विभक्त होण्याचा निर्णय घेतला. २०२३ मध्ये त्यांचे ब्रेकअप झाले होते. त्यानंतर हे दोघे पुन्हा एका लघुपटासाठी एकत्र आल्याने त्यांच्या चाहत्यांना आनंद झाला आहे. एजाज आणि पवित्रा दलजीत कौर निर्मित 'नफ्स' नावाच्या लघुपटावर काम करण्यासाठी एकत्र आले आहेत. एजाजने पवित्राबरोबरच्या नात्याबद्दल म्हणाला, आम्ही या लघुपटाचे चित्रीकरण तीन वर्षांपूर्वी केले होते. मला यापेक्षा जास्त भाष्य करायचे नाही. याबद्दल आणखी काय ते दलजीतच सांगू शकते. यानंतर दलजीतलाने एजाज आणि पवित्राच्या लघुपटाविषयी असं म्हटलं की, एजाज आणि पवित्रा दोघेही कलाकार आहेत. 'बिग बॉस'च्या घरातून बाहेर आल्यानंतर मी त्यांच्याबरोबर चित्रीकरण केले होते. दोघांनी खुप छान काम केलं आहे. दुर्दैवाने हा लघुपट प्रदर्शित होण्यास खूप वेळ लागला.

# कियाराचा 'डॉन ३' मधून पत्ता कट

'डॉन', 'डॉन २' चित्रपटाच्या यशानंतर 'डॉन ३' चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. गेल्या वर्षभरापासून या चित्रपटाची चर्चा रंगली आहे. पण, फरहान अख्तरच्या बहुप्रतीक्षित 'डॉन ३' चित्रपटाचं चित्रीकरण सतत पुढे ढकललं जात आहे. या चित्रपटात रणवीर सिंह आणि कियारा अडवाणी एकत्र काम करणार होते. मात्र, कियाराचा 'डॉन ३' चित्रपटातून पत्ता कट झाल्याचं समोर आलं आहे. कियाराची जागा एक मराठमोळी अभिनेत्री घेणार आहे. जिचा संबंध महाराष्ट्राच्या राजकारणाशी आहे. लवकरच आई होणार्या कियारा अडवाणीची 'डॉन ३' चित्रपटातून एक्झिट झाली आहे. त्यामुळे तिच्या जागी आलिया भट्टची को- स्टार, २०२४ बॉलीवूड गाजवणारी मराठी अभिनेत्रीची वर्णी लागली आहे. 'डॉन ३' चित्रपटात रणवीर सिंहबरोबर झळकणारी ही मराठी अभिनेत्री कोण आहे? आणि चित्रपटाचं चित्रीकरण कधी सुरू होणार? जाणून घेऊयात...काही महिन्यांपूर्वी कियारा अडवाणीने लवकरच आई होणार असल्याची घोषणा केली होती. त्यामुळेच आपल्या वैयक्तिक आयुष्याला प्राधान्य देत कियाराने 'डॉन ३' चित्रपट सोडण्याचा निर्णय घेतल्याचं म्हटलं जात आहे. म्हणून 'डॉन ३'च्या निर्मात्यांनी कियाराच्या जागी महाराष्ट्राचे माजी दिवंगत माजी मुख्यमंत्री मनोहर जोशीची नात म्हणजे अभिनेत्री शर्वरी वाघची निवड केली आहे. वृत्तानुसार, फरहान अख्तर दिग्दर्शित या चित्रपटासाठी शर्वरीचं नाव निश्चित झालं आहे. तसंच निर्माते या फ्रेंचाइजीचा तिला भाग बनवण्यासाठी खूप उत्सुक आहेत. 'डॉन ३' चित्रपटाचं चित्रीकरण २०२५च्या अखेरपर्यंत सुरू होऊ शकतं. या चित्रपटातील डॉनच्या भूमिकेसाठी रणवीर सिंह ठरला आहे आणि आता त्याच्याबरोबर शर्वरीचं नाव प्रमुख भूमिकेसाठी घेतलं जात आहे. पण, अजूनपर्यंत चित्रपटाच्या कास्टिंग संदर्भात अधिकृतरित्या निर्मात्यांनी भाष्य केलेलं नाही. दरम्यान, शर्वरी वाघच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, आदित्य सरपोतदार दिग्दर्शित 'मुंज्या' चित्रपटामुळे शर्वरी अधिक प्रसिद्धी झोतात आली. सध्या शर्वरी आगामी चित्रपट 'अल्फाच्या' चित्रीकरणात व्यग्र आहे. या चित्रपटात ती आलिया भट्टसह पाहायला मिळणार आहे.

